# भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ मधील प्रकरण २१ अन्वये कलम २७४ अन्वये
# संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक १८२/२०२५ चा अभिलेख
## मालवण येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात

**निशाणी**

१) अपराध घडल्याचा दिनांक : २४/०९/२०२५

२) फिर्याद दाखल केल्याचा दिनांक : २४/०९/२०२५

३) फिर्यादीचे नाव, वय व पत्ता : महादेव अभिनाथ घागरे, वय ३५ वर्षे,
धंदा- नोकरी, पोकॉ १७८
नेमणुक- मालवण पोलीस ठाणे, जि. सिंधुदुर्ग.

४) आरोपीचे नाव, वय व पत्ता : दिनकर उर्फ भाई दाजी खोबरेकर,
वय- ५१ वर्षे, धंदा - शेती
रा. धुरीवाडा मालवण, ता.मालवण,
जि.सिंधुदुर्ग

५) अपराधाचा तपशील :

तुम्ही दि. २४/०९/२०२५ रोजी रात्री ८.१५ वाजण्याच्या सुमारास मौजे धरीवाडा मालवण येथील हॉटेल भाई भाई क्र. २२८० ब/१ या घरात तुम्ही स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता मटका जुगाराचे आकडे व पैसे, ऑनलाईन व प्रत्यक्ष स्वीकारुन ऑनलाईन मटका जुगार खेळ खेळवत असताना व त्याचा हिशोब करताना मिळून आला व त्याव्दारे तुम्ही महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलम ४ व ५ द्वारे शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला आहे. असा तुमच्यावर आरोप ठेवणेत येत आहे.

६) आरोपीचे प्रतिकथन :

प्रश्न क्र. १ : अभियोग पक्षाच्या कागदपत्रांच्या प्रती तुम्हाला मिळाल्यात काय ?

उत्तर : होय

प्रश्न क्र.२ : अपराधाचा जो तपशील तुम्हाला वाचून व स्पष्ट करुन सांगण्यात आला तो तुम्हाला समजला काय ?

उत्तर : होय

प्रश्न क्र.३ : तुम्हाला गुन्हा मान्य आहे काय ?

उत्तर : मला गुन्हा मान्य नाही.

-----------------

दिनांक : २१/०१/२०२६ (आरोपीची सही )

समक्ष,

( एम.के.फकीह )
न्यायदंडाधिकारी वर्ग–१, मालवण

आरोपीला गुन्हयाबाबतचा तपशिल वाचून दाखविला व मराठीतून समजावून सांगितला असता आरोपीने गुन्हा नाकबूल करुन अभियोग चालविण्याची तयारी दर्शविली.

( एम.के.फकीह )
दिनांक : २१/०१/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१, मालवण